नियमित दिवाणी दावा क्र.७२८/२०२२
नि.क्र.२६/ क (सोबत)

वादीतर्फे साक्षीदार क्र.१

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. आर.ए. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

१. मी १९७० मध्ये १०वी नापास आहे. माझे जन्म १९४५ सालचा आहे. मी माझा शाळा सोडल्याचा दाखला सादर करु शकतो. माझ्या लग्नाच्यावेळी माझे वय १८-२० वर्षे होते. उमरदरा, ता. शिरुर अनंतपाळ माझे सासर आहे. माझ्या सासऱ्याचे पूर्ण नाव दिगंबर व्यंकोबा फावडे असे होते. त्यांना विश्वांभर नावाचा एक सख्खा भाऊ होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्न झाले त्यावेळी माझ्या सासऱ्याचे एकत्र कुटूंब होते. माझ्या पत्नीला तीन सख्या बहिणी व चार भाऊ होते. माझे सासरे माझ्या लग्नानंतर अंदाजे १० वर्षानी मयत झाले. माझे सासरे शेती करत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासऱ्यांची खडकाळ जमीन आहे. त्यांना ४० एकर जमीन होती. त्यांच्या नावे असलेल्या जमिनीची कागदपत्रे मी दाखल करु शकतो. माझे लग्न झाले त्यावेळी सासरे जुंदळा, हरभरा पिक घेत होते. माझी पत्नी सासऱ्याची तीन नंबरची मुलगी होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासरवाडीचे कुटूंब मोठे होते व त्यांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्यांच्या शेतातून चांगले उत्पन्न निघत होते. मला माझ्या सासरहून जमीन, प्लॉट व घर मिळालेले नाही. १९७६ साली माझ्या सासऱ्याने त्यांची जमीन माधव सुरवसे यांना विक्री केली होती. सदर जमिनीचा सर्वे नंबर व विक्रीची किंमत मला माहीत नाही. सदर जमीन विक्रीचे कागदपत्र मी दाखल करु शकत नाही.

२. मौजे शिवपूर येथील सर्वे नं.५९ मधील ४ एकर ३८ जमीन, सर्वे नं.६० मधील ५ एकर ३१ गुंठे तथाकथीत जमीन खरेदी करतेवेळी माझे वय २०-२१ होते. सदर जमीन मी गोविंद सुरवसे यांच्याकडून खरेदी घेतली होती. सदर खरेदीखत निलंगा येथे १९७१ साली झाले होते. सदर खरेदीखतावेळी सुर्यभान पवार, दिगंबर जाधव, माझे वडील व चुलते हजर होते. सदर खरेदीखतावरील साक्षीदार म्हणून दिगंबर जाधव व माझे सासरे हजर होते. सदर जमीन रु.२०,०००/- मध्ये खरेदी घेतली होती. सदर खरेदीखत मी दाखल करु शकतो. माझ्या लग्नाचा पुरावा माझ्याकडे नाही. सदर खरेदीखतावर लिहून घेणार म्हणून माझी सही आहे.

३. माझ्या आजोबाचे नाव सखाराम रामचंद्र माने असून त्यांना शंकरराव व लिंबराज असे दोन मुले आहेत. लिंबराज माझे चुलते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांना जोगाळा येथे गट नं.९/ब मध्ये वडीलोपार्जित ९ एकर ९ गुंठे जमीन होती. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.९/ब च्या एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नामधून माझ्या वडीलांनी व चुलत्यांनी मिळून दि.२१/३/१९७७ रोजी प्रत्येकी ७ एकर २३ गुंठे जमीन विकत घेतले होते. त्याप्रमाणे फेरफार क्र.३९३ व ३९९ माझ्या वडीलांच्या व चुलत्यांच्या नावे मंजूर झाला होता. माझे वडील व चुलते १९७१ साली वेगळे झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.९/ब च्या एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नामधून माझ्या वडीलांनी व चुलत्यांनी मिळून १९७६ साली माझ्या नावे मौजे शिवपूर येथील सर्वे नं.५९ मधील ४ एकर ३८ जमीन, सर्वे नं.६० मधील ५ एकर ३१ गुंठे जमीन विकत घेतली होती व त्याआधारे फेरफार मंजूर झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.९/ब च्या एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नामधून सर्वे नं.६० मधील २० एकर ३७ गुंठे जमीन विकत घेतली होती. माझ्या वडीलांना व चुलत्यांना मिळून सर्वे नं.६० मध्ये १५ एकर ९ गुंठे व जोगाळा शिवारामध्ये गट नं.९/ब मध्ये जमीन होती. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नं.६० मधील २० एकर ३७ गुंठे,

गट नं.९/ब मध्ये ९ एकर ९ गुंठे जमीन व सर्वे नं.५९ मधील ४ एकर ३८ जमीन माझ्या वडीलांना माझ्या भावाकडून वाटून आली होती. हे म्हणणे खरे नाही की, १९८३ साली सदर वाटणी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या चुलत्यांनी १९७७ साली सर्वे नं.६० मधील ७ एकर २३ गुंठे जमीन खरेदीखत दस्त क्र.४५८/७७ अन्वये विकत घेतली होती व त्याआधारे १९८४ साली फेरफार क्र.३९९ मंजूर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या व चुलत्यांच्या १९८३ सालच्या वाटणीमध्ये माझ्या चुलत्यांनी सर्वे नं.६० मधील ७ एकर २३ गुंठे जमीन माझ्या वडीलांना वाटून दिली होती व त्याआधारे फेरफार क्र.४०३ मंजूर झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी व माझ्या वडीलांनी महाराष्ट्र को-ऑप डेव्हलपर शाखा उदगीर या बँकेकडून कर्ज घेतला होता व त्याआधारे फेरफार क्र.४३९ मंजूर झाला होता.

४. सर्वे नं.५९ व ६० चा एकत्रीकरणानंतर गट क्र.१७९ व १७८ पडला होता, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या भावा-भावाचे जमत नसल्यामुळे १९८९ साली सर्वे नं.५९, ६० व ९/ब मधील मिळकतींची माझ्या वडीलांनी वाटणी करुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.६० मधील माझ्या वडीलांच्या नावे असलेली जमीन प्रतिवादी क्र.१ व २ यांना प्रत्येकी ७ एकर २३ गुंठे जमीन वाटून दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नं.९/ब मधील ९ एकर ९ गुंठे जमीन प्रतिवादी क्र.१ रमेश यांना वाटून दिली होती. मी फेरफार क्र.४८१ पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाटणीप्रमाणे फेरफार क्र.४८१ मंजूर झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी सर्वे नं.६० मधील ५ एकर ३१ गुंठे व सर्वे नं.५९ मधील ४ एकर ३८ गुंठे जमीन माझ्या नावे करुन दिली होती.

५. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१८० मधील २ एकर रामराव सुरवसे यांच्याकडून १९९२ साली विकत घेतली. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन आमच्या भावा-भावामध्ये १९८८ साली वाटणीनंतर विकत घेतली. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तिनही भाऊ वेगवेगळे राहतो व वेगवेगळी जमीन कसत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तिनही भाऊ वेगवेगळे राहिल्यानंतर १९९२ साली मी २ एकर जमीन रामराव सुरवसेकडून विकत घेतली व त्याआधारे फेरफार क्र.३६ मंजूर झाला. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर जमीन २००५ साली माझा भाऊ रमेश यांच्या नावे अदलाबदल दस्ताद्वारे करुन दिली होती तसेच त्याने त्याच्या नावची जमीन माझ्या नावे करुन दिली होती. जोगाळा येथील गट नं.९/ब मधील १ हे. २६ आर जमीन २००६ साली प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी नं.१ कडून विकत घेतली होती व त्याआधारे फेरफार मंजूर झाला होता, याबाबत मला माहिती नाही. आता मला खरेदीखत क्र.१४७९/२००२ दाखवण्यात आले, ते बरोबर असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२८** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखताआधारे फेरफार मंजूर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतामध्ये पश्चीमेला रमेश व उत्तरेला मधुकर यांच्या जमिनी असल्याचे मी नमूद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखताअगोदर रमेश व मधुकर १५-२० वर्षापासून सदर जमीन कसत होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ याने सर्वे नं.६० ज्याचा गट नं.१७८ मधील २ एकर जमिनीसंदर्भात माझ्याविरुध्द मनाई हुकूमाचा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर २ एकर जमीन हडप करण्याच्या उद्देशाने मी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा नातू व सुन यांनी सर्वे नं.६० ज्याचा गट क्र.१७८, सर्वे नं.५९ चा गट क्र.१७९ व ९/ब मधील मिळकतीसंदर्भात

माझ्याविरुध्द वाटणीचा दावा क्र.६५/२०१९ दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यामध्ये तडजोडीचा हुकूमनामा झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.५९ व ६० मधील जमीन माझ्या मुलाच्या व नातीच्या नावे करुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर तडजोडीमध्ये वरनमूद मिळकती या वडीलोपार्जित एकत्र कुटूंबाच्या मिळकती असल्याचे नमूद केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.03.13 17:13:06 +0530

दि.१३/०३/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.